## शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका
## शिवाजी नगर, पुणे ४११००५
## प्रयोगशाळेसाठही स्टूल खरेदीकरणेकामी निविदा अटी व शर्ती २००९–१०.

१.पुणे दैनिक लोकमत दि. १९/०२/२०१० व दैनिक सकाळ दि. १९/०२/२०१० मधील प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा क्रं २६/ भांडार सुचनेस अनुसरून प्रयोगशाळेसाठी स्टूल पुरविणेकामी विहीत नमुन्यातील निविदा फॉर्म व निविदा खालीलप्रमाणे.`

**शिक्षण मंडळ पुणे म.न.पा., पुणे व त्यांनी नियुक्त व अधिकृत केलेल्या खरेदी समितीने** आर्थिक वर्ष २००९–१० चे करिता प्रयोगशाळेसाठी स्टूल पुरविणेकामी विशिष्ठ मुदतीत करणेसाठी निविदा अटी व शर्ती खालील प्रमाणे.

**२. अटी व शर्ती :–**

१.निवीदा सीलबंद असली पाहिजे. दिलेल्या मुदतीत व वेळेत निवीदा आली नाही तर ती स्विकारली जाणार नाही.

२.निविदेसाठी दोन लिफाफा पध्द्त असुन अ पाकीटमध्ये खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

**३.अ.पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे.**

**१)** निवीदा रकमेच्या शेकडा १% या दराने बयाणा रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बॅकेचा मा. शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा, पुणे यांचे नावे काढलेल्या धनाकर्ष (DD)कार्यालयात चलनाने भरणा करावा २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयानुसार परिशिष्ट १२ अन्वये संबंधित लघुउद्योगाकडे अधिकृत पुरवठादार असल्याचे विकास आयुक्त, उद्योग व भांडार यांचे अधिकृत नोंदणी असल्याबाबतचे चालू वर्षाचे पत्र सोबत जोडले तरच निवीदादारास बयाणा रक्कम व अनामत रकमेमध्ये सुट मिळेल अन्यथा त्याला एस.एस.आय.युनिट असेल तरीसुध्दा वरील रकमा भराव्या लागतील.

**२)** निवीदादाराचे संस्था नोंदणी केलेले अद्ययावत प्रमाणपत्र.

**३)** आर्थिक वर्ष २००८–०९ मध्ये अद्ययावत व्हॅट भरल्याबाबतचा पुरावा तसेच मार्च २००९ अखेर व्हॅट क्लिअरन्स सर्टिफिकेट जोडावे

४)शासन किंवा शासन (अंगिकृत) व इतर संस्था फर्निचर पुरविल्याबाबतचे अनुभवाची कागदपत्रे किंवा प्रमाणपत्र

५)निविदादाराचे आयकर खात्याकडे नोंदणी केल्याचा नोंदणी प्रमाणपत्राची (Pan No) छायांकित प्रत, तसेच मागील वर्षाचे इन्कम टॅक्स रिर्टन प्रत.

६)निविदादार नोदणीकृत सहकारी संस्था, नोंदणीकृत कंपनी किंवा नोंदणीकृत भागीदारी संस्था असेल तर संबंधित नोंदणी प्रमाणपत्र कार्यालयीन संचालकांची किंवा भागीदारांची पूर्ण नावे, वय, पत्ते व संस्थेचे नोंदणीकृत दाखल्याची प्रत, संस्थेने सहीचे अधिकार दिल्याबाबतचे पत्र तसेच निविदादार शासन किंवा शासन अंगिकृत संस्था असेल तर त्याबाबतची सर्व कागदपत्रे

७)व्यवसाय कर भरणा केलेले अद्ययावत चलनाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

८)अ पाकीटात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पाकीट उघडताना शिक्षण मंडळाचे कार्यालयास तपासणीचे कामी सादर करावी लागतील.

**४)**पाकीट ब मध्ये निविदा धारकाने बाबनिहाय सर्व करासह दर भरावेत

५) अ पाकीटमध्ये आवश्यक ती कागदपत्रे नसल्यास ब पाकीट उघडण्यात येणार नाही. याबाबत खरेदी समितीचा निर्णय अंतिम राहील. निविदेसोबत दिलेले प्रयोगशाळा स्टूल यांची तपासणी करून घेण्यात येईल. ज्या निविदादारांचे नमूने स्पेसिफिकेशनप्रमाणे असल्याचा तपासणी अहवाल येईल अशा निविदादारांचे पाकीट क्रमांक २ दराचे पाकीट उघडण्यात येईल.
६) ब पाकीटात सादर करावयाचे कागदपत्रे विहीत नमून्यातील प्रयोगशाळेसाठी स्टूल यांचे दर सर्व करासह सादर करावयाचे आहे.

**७.निवीदादाराने पुर्तता करावयाच्या अटी व शर्ती.**

**१**.निविदा स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेली असावी. प्रयोगशाळेसाठी स्टूल पुरविणेकामीचे दर अंकी व अक्षरी असावीत. .

**२**.निवीदा स्विकारण्याचा, नाकारण्याचा पुर्ण अगर अशंतः मंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार खरेदी समितीस आहे.

**३**.निविदाकरिता मंजूर व जाहीर केलेल्या रकमेत संख्येत बदल करण्याचा अधिकार खरेदी समितीस आहे.

**४**.मान्य निवीदा धारकास निविदा दर स्विकृती मिळाल्यापासुन ७ दिवसाच्या आत शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमानुसार सर्वसाधारण मुद्राकावर करार करणे बंधनकारक आहे.करार करण्यास निविदादाराने असमर्थता दर्शविल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. प्रसंगी शिक्षण मंडळास सदर प्रक्रियेतुन काही नुकसान झाले असल्यास तीही रक्कम संबधितांकडून वसूल करण्यात येईल.

**५**.मान्य निवीदादारास करार करतेवेळी प्रयोगशाळेसाठी स्टूल खरेदी करणेच्या एकूण किंमतीच्या ५ % रक्कम सुरक्षा/अनामत रक्कम म्हणून शिक्षण मंडळाकडे धनाकर्ष (DD) ने भरावी लागेल.

**६**.निवीदेतील मान्य दर फक्त आर्थिक वर्ष २००९–१० करिताच करार केल्यापासून बंधन कारक राहतील.

**७**.निविदा फॉर्मनुसार ब पाकीटात ज्या प्रयोगशाळेसाठी स्टूल दर भरण्यात आलेले आहेत त्याचा प्रत्येकी एक नमूना निविदादाराने स्वखर्चाने निविदेसोबत द्यावयाचा आहे. सदर नमूना खरेदी करावयाची जबाबदारी किंवा त्याकामी आलेला खर्च देण्याची जबाबदारी मा. शिक्षण मंडळावर नाही. नमूना दिल्याशिवाय निविदा स्विकारता येणार नाही.

८.बयाणा रक्कम व अनामत रक्कम पूर्णपणे एकमेकांपासून वेगळया आहेत. सदर रकमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

**९**. प्रयोगशाळेसाठी स्टूल पुरविणेकरीता करारनाम्यात दिलेली मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही. सदर मुदत करारनाम्याची विशेष व महत्वाची अट राहिल. मात्र विशेष परिस्थितीत दिलेली मुदत वाढविण्याचा अधिकार मा. खरेदी समितीस राहिल.

**१०**. दिलेल्या मुदतीत स्पेसिफिकेशन प्रमाणे प्रयोगशाळेसाठी स्टूल पुरवठा न केल्यास निविदादराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्रसंगी निवीदादारास ब्लॅकलिस्ट करण्याचा अधिकार मा. खरेदी समितीस आहे व राहिल. वेळी व प्रसंगी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज संबधित ठेकेदाराविरूध्द् लवादाकडे सादर केला जाईल व त्याच्या खर्चास व परिणामास संबंधितास जबाबदार धरले जाईल.

११. करारनाम्यानुसार पुरवठा करावयाचे प्रयोगशाळेसाठी स्टूल मा.शिक्षण मंडळ कळविल त्या ठिकाणी स्वखर्चाने जकातीच्या रकमेसह पोहचविण्याची जबाबदारी निविदादारावर आहे.

१२.करारनाम्यानुसार स्पेसिफिकेशननुसार मुदतीत प्रयोगशाळेसाठी स्टूल पुरविण्यात न आल्यास ती स्विकारली जाणार नाही न स्विकारलेले प्रयोगशाळेसाठी स्टूल १० दिवसाच्या आत स्वखर्चाने संबंधित निविदादाराने त्याठिकाणापासून स्वखर्चाने नेले पाहिजे ते न नेल्यास त्यास दररोज रूपये १०००/— (अक्षरी रूपये एक हजार फक्त) प्रमाणे जागा भाडे आकारले जाई व ३० दिवसांपेक्षा जास्त दिवस झाल्यास त्या मालाची जबाबदारी मा.शिक्षण मंडळावर राहणार नाही किंबहूना शिक्षण मंडळ संबंधित नकरलेल्या मालाची विल्हेवाट मनमानेल त्याप्रमाणे करील.

१३.करारनाम्याप्रमाणे शाळांमधील पुरविलेले सर्व प्रयोगशाळेसाठी स्टूल मोजून, तपासून घेवून दिलेल्या नमुन्या प्रमाणे सर्व प्रयोगशाळेसाठी स्टूल पुरविले असल्याची खात्री मा. खरेदी समितीस झाल्याशिवाय बिल मिळणार नाही.कोणत्याही स्वरूपात हप्त्याचे आगाऊ बिल मिळणार नाही. कोणासही ॲडव्हान्स रक्कमेची मागणी करता येणार नाही तसेच देय बिलातून आयकर कलम १९४ सी नुसार टीडीएसच्या रकमेची कपात केली जाईल.

१४.एकदा भरलेली निवीदा रदद् करता येणार नाही एखादयाला ती जर रदद् करावयाची असेल तर त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार खरेदी समितीस राहिल तसेच सदरची निविदा दुसऱ्या ठेकेदारास दिल्यानंतर बिलातील येणारा जादा फरक दंड म्हणून वसूल करण्यात येईल.

१५. मा.शिक्षण मंडळाने निविदेमध्ये नमुद केलेले प्रयोगशाळेसाठी स्टूल पुरविणेकामी काम मंजुर निविदादारास दिल्यानंतर इतर निविदादारांची बयाणा रक्कम चेकने परत दिली जाईल.त्यापूर्वी कोणासही बयाणा रक्कम दिली जाणार नाही. बयाणा रक्कम मागणी अर्जासोबत मूळ पावती जोडणे आवश्यक आहे.

१६. निविदादाराने प्रयोगशाळेसाठी स्टूल तयार झालेले आहे त्या संबधी पाहणी व तपासणी करण्याची विनंती खरेदी समितीस केली पाहिजे व तसे विनंती पत्र देणे आवश्यक आहे.

१७. प्रयोगशाळेसाठी स्टूल पुरविणेकामी काही वाद निर्माण झाल्यास तो करारनाम्यानुसार लवादाचा विषय असेल व उभय पक्षाला संबधित वाद निर्णयाकरिता लवादाकडेच पाठवावा लागेल.

१८ प्रयोगशाळेसाठी स्टूल पुरविणेकामीची निविदा एकास/अनेकास देणे किंवा विभागून देण्याचा अधिकार खरेदी समितीस आहे.

१९. प्रयोगशाळेसाठी स्टूल पुरवठा झाल्यानंतर त्याची खरेदी समितीकडून पाहणी करण्यात येईल. दिलेला प्रयोगशाळेसाठी स्टूल पुरवठा विहित नमुन्यात आहेत किंवा नाही हे पाहिले जाईल खराब किंवा स्पेसिफिकेशन प्रमाणे नसलेला प्रयोगशाळेसाठी स्टूल पुरवठा कोणत्याही परिस्थितीत स्विकारला जाणार नाही.

२०. प्रयोगशाळेसाठी स्टूल निविदादाराने स्पेसिफिकेशनप्रमाणे किंवा पुरविलेल्या प्रयोगशाळेसाठी स्टूल खरेदी समितीस काही शंका आली तर त्याची गुणवत्तेची तपासणी समक्ष लॅबकडून करण्यात येईल व त्याची खर्चाची सर्वस्वी जबाबदारी निविदादारावरच राहील.

२१. प्रयोगशाळेसाठी स्टूल पुरवठा ठरवून दिलेल्या मुदतीत केल्यानंतर प्रयोगशाळेसाठी स्टूल पुरविणेकामी एकत्रित देयक मा.शिक्षण प्रमुख शिक्षण मंडळ पुणे म.न.पा.पुणे यांच्या नावे या कार्यालयात सादर करावे लागेल. शाळावार प्रयोगशाळेसाठी स्टूल पुरवठा केलेली चलन्स संबधित शाळेच्या मा.मुख्याध्यापकाच्या स्वाक्षरी व शिक्यासह देयकासमवेत सादर करावी लागतील त्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत बिल देण्याबाबत कार्यवाही केली जाणार नाही.

२२. निविदा दिनांक ०६/०३/२०१० रोजी दुपारी  वाजता उघडण्यात येतील.वेळी व त्याप्रसंगी ठेकेदार स्वत: किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. प्रशासकीय कारणास्तव त्या दिवशी निविदा न उघडलयास निविदा उघडण्याचा नवीन दिनांक सहभागी निविदादारास दूरध्वनी वरुन कळविण्यात येईल. वेळी व त्याप्रसंगी निविदादारास हजर रहावे लागेल त्याकामी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

पुणे.

दिनांक:—

| | |
|---|---|
| स्वाक्षरी/— | स्वाक्षरी/— |
| **अध्यक्ष** | **शिक्षण प्रमुख,** |
| **शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.** | **शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.** |

---

**प्रतिज्ञालेख**

मी,श्री.——————————————————वय———वर्ष

व्यवसाय—धंदा,राहणार————————————————————

निविदादार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,वरील निवीदेच्या,फॉर्म सोबतच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असून त्या सर्व मला व माझ्या संस्थेला मान्य आहेत. त्यानुसारच निवीदा भरलेली आहे व निवीदासोबत मला अटी व शर्ती मान्य आहेत. म्हणून सदर प्रतिज्ञापत्रावर आज रोजी पुणे येथे सही करुन निवीदेसोबत दाखल करित आहे.

**पुणे:—**

**दिनांक:—**

**पुरवठा धारकाची सही व शिक्का**

शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका
स्पेशिफिकेशन 2009 – 2010
निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक –05 / 03 / 2010
वेळ – दुपारी 1.00 वाजेपर्यंत
बयाणा रक्कम रूपये – 30,000 / –
प्रयोगशाळेसाठी स्टूल

## 1 . प्रयोगशाळेसाठी लाकडी (सागवानी) स्टूल :–

अंदाजे नग संख्या – 2950

सागवानी
साईज 12'' X 12'' X 21'' उंच
सागवानी 4 पाय 2'' X 2'' वरील सपोर्ट 3'' X 1''
खालील ताणपटटी 2'' X 1''
स्टूल टॉप 12'' X 12'' X 1'' जाड
उत्तम पॉलीशसह

सूचना :–

1. शिक्षण मंडळ कार्यालयाने दिलेल्या यादीप्रमाणे स्टूल व टेबल मनपा प्राथमिक शाळांना वाटप करावे लागेल.
2. शाळाप्रमुखांची सही व शिक्क्यानिशी पोहोच पावती घेऊन देयक सर्व पावत्यासह व एकीकरण तक्त्यासह पाठवावे लागेल.
3. स्टूल व टेबल दर्शनी भागावर शिक्षण मंडळ सन 2009–2010 असे ऑईलपेंटने टाकून द्यावे लागेल.
4. निविदेसोबत नमूने देणे आवश्यक आहे. त्याशिवाय निविदा स्विकारली जाणार नाही.

स्वाक्षरी / –
अध्यक्ष,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका

स्वाक्षरी / –
शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका

**शिक्षण मंडळ कार्यालय,पुणे महानगरपालिका**
**कै.भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना**
**निविदा क्रमांक २६**

शिक्षण मंडळ,पुणे महानगरपालिका यांचेकडून खालील तपशीलात नमूद केलेल्या बाबींसाठी दोन लिफाफा (**Two Bid System**) सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा अर्जासोबत निविदा अटी व इतर सविस्तर माहिती वरील पत्त्यावर समक्ष मिळेल पोष्टाने माहिती पाठविली जाणार नाही व पोष्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

१.**कोरे निविदा प्रपत्र विक्री** —निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून शुक्रवार दिनांक १९/०२/२०१० पासून शुक्रवार दिनांक ०५/०३/२०१० पर्यत कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत.

२.**निविदा व बयाणा स्विकृतीची तारीख व वेळ** — निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून .शनिवार दिनांक ०६/०३/२०१० रोजी दुपारी १.००वाजे पर्यत

३.**निविदा उघडण्याची तारीख व वेळ** — शनिवार दिनांक ०६/०३/२०१० रोजी दुपारी ३.००वाजता किंवा कार्यालयीन सोयीनुसार निविदा भरणाऱ्यांच्या किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

४.**निविदा दर** — सर्व करांसह देणे आवश्यक आहे.

५.शिक्षण मंडळ,पुणे मनपाचे करिता शैक्षणिक वर्ष २००९—१० अखेर करावयाच्या बाबी व त्याचा तपशील.

| अ | तपशील | रुपये | फॉर्म किंमत | अंदाजे नग संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | प्रयोगशाळेसाठी स्टूल | ३०,००,०००/— | २,०००/— | २९५० |
| २ | प्रयोगशाळेसाठी टेबल | ९०,००,०००/— | २,०००/— | ४७० |

**सूचना**—१. निविदा भरताना बयाणा रक्कम शेकडा १ टक्का व निविदा मान्य झाल्यावर शेकडा ५ टक्के अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे.

२. कोणतीही निविदा स्विकारणे व नाकारणे हा शिक्षण मंडळाने स्थापन केलेल्या खरेदी समितीचा अधिकार आहे व राहिल.

३. सदर निविदा त्या संबधीची सर्व माहिती पुणे मनपाच्या वेबसाईट www.pune corporation.org वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे व शिक्षण मंडळाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली आहे.

**स्वाक्षरी/—**
**अध्यक्ष,**
**शिक्षण मंडळ,पुणे मनपा**

**स्वाक्षरी/—**
**शिक्षण प्रमुख,**
**शिक्षण मंडळ,पुणे मनपा**